# मुंबई विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी मर्यादित

**नोंदणी क्रमांक : २५०७६/१९५९**

क्रमांक. व्यवस्थापन/४/२०१३
दिनांक : ८ ऑक्टोबर,२०१३

**परिपत्रक :**

विषय :— ९७ वी घटना दुरुस्ती व आदर्श उपविधी
स्विकारणे बाबत.....

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

पतपेढीच्या दिनांक १८ जून, २०१३ रोजी झालेल्या ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मान्य झालेल्या ठराव क्रमांक ७ नुसार ९७ व्या घटना दुरुस्ती व आदश उपविधीस मा. उपनिबधक, सहकारी संस्था, अे—विभाग,यांनी बी—३/पोनिदु/६५६/२०१३ दिनांक ११.९.२०१३ अन्वये मंजूरी दिली असून त्यामध्ये खालील महत्वाचे बदल झाले आहेत.

१) संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रुपये २ कोटी ५० लाख झालेले आहे. त्यामुळे प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रुपये १००/—(शंभर) ऐवजी रुपये ५००/—(पाचशे) करण्यात आलेली आहे. व प्रत्येक सभासदाचे भाग भांडवल धारण मर्यादा हे रुपये ५,०००/—(पाच हजार ) ऐवजी रुपये १०,०००/—(दहा हजार) करण्यात आलेली आहे.

२) संस्थेची नाममात्र सभासद फी रुपये १०/—(दहा) ऐवजी रुपये १००/—(शंभर) करण्यात आलेली आहे.

३) संस्थेच्या दिर्घमुदत कर्ज कमाल मर्यादा रुपये ८,५०,०००/—(आठ लाख पन्नास हजार) वरुन रुपये १२,००,०००/—(बारा लाख) करण्यात आलेली आहे. त्या कर्जाची परतफेड मासिक समान १८० हप्त्यात करावयाची आहे. 'फ—१—१०(१)' अन्वये

४) संस्थेने गृहपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी सभासदांना रुपये २५,०००/—(पंचवीस हजार) कर्जऐवजी ऐवजी रुपये ५०,०००/—(पन्नास हजार) गृहपयोगी वस्तू खरेदी कर्ज करण्यात आलेले आहे.गृहपयोगी वस्तू खरेदी कर्ज मिळण्यासाठी सभासदाच्या एकूण मासिक वेतनाच्या १/३ पगार हाती येणे आवश्यक आहे. त्या कर्जाची व्याजासह परतफेड २४/३६ हप्त्यात करावयाची आहे.

४) संस्थेच्या अल्पमुदत कर्ज कमाल मर्यादा १८,०००/—(अठरा हजार )ऐवजी रुपये २०,०००/—(वीस हजार) वाढ करण्यात आलेली आहे. त्या कर्जाची परतफेड व्याजासह मासिक समान १२ हप्त्यात करावयाची आहे.

५) **वाढीव कर्ज मर्यादा विचारात घेता सभासदांनी दि.१४/१०/२०१३ पूर्वी आपले दिर्घमुदतीचे अर्ज पूर्ण माहितीसह कार्यालयात सादर करावेत.**

तरी पोट नियमात केलेल्या ठळक बदलांची पतपेढीच्या सर्व सभासदांनी कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपले विश्वासू,

( अनंत हरिश्चंद्र चव्हाण )
**अध्यक्ष**

( पांडुरंग गणपत पाते )
**मानद सचिव व खजिनदार**